प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

फेब्रुवारी 15, 2016

**दि कापडवंज पिपल्स सहकारी बँक लि., कापडवंज, जिल्हा खेडा (गुजराथ) ह्यांना आरबीआयकडून आर्थिक दंड जारी**

बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, 1949 (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) च्या कलम 46(4) सह वाचित कलम 47 अ(1)(ब) च्या तरतुदींखाली तिला मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने, दि कापडवंज पिपल्स सहकारी बँक लि., कापडवंज, जिल्हा खेडा (गुजराथ) ह्यांना पुढील उल्लंघनांसाठी रु.2 लाख (रुपये दोन लाख) दंड ठोठावला आहे - बी.आर. अधिनियम, 1949 (एएसीएस) च्या कलम 36(1) खाली दिलेल्या कार्यकारी सूचनांचे; आणि स्वतःचे हितसंबंध गुंतले आहेत असे संचालक/त्यांचे नातेवाईक/संस्था ह्यांना कर्जे व अग्रिम राशी देणे बाबतच्या, तुमचा ग्राहक जाणा (केवायसी)/अँटी मनी लॉडरिंग (एएमएल) निकष व कोअर बँकिंग सोल्युशन्स ह्याबाबत, रिझर्व बँकेने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन.

रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती आणि तिला त्या बँकेने लेखी पत्र सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य गोष्टी व प्रत्यक्ष/वैय्यक्तिक केलेले सादरीकरण विचारात घेऊन, रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की वरील उल्लंघने झाली असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/1925**